|| सबका मालिक आत्मा ||



# आत्मा (SOUL)

|| हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ||

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

||ॐ गुरुदेव||

# आत्मा मालिक

एप्रिल-२०२६

॥ सबका मालिक आत्मा ॥



# ।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता ‘स्व–रुपाला’ पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्‌गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ॥ आत्मा मालिक ॥

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''
# मासिक ॐ गुरुदेव
वर्ष २५ वे अंक ४ था एप्रिल २०२६ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**
हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**
संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**
श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**
संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**आत्मा मालिक ध्यानपीठ**
दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**
श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**
विलास गायकवाड,
मो. ९९२२१७४२११

संपादकीय - एकाग्रतेतील जागृतता - संत परमानंद महाराज ४
बहिर्निष्ठ पूजा हे अंतर्निष्ठ पूजेचे प्रतीक -डॉ. विजय बाणकर ६
नामदेवांचे अभंग आत्मचरित्र भाग ६ - नामदेव सदावर्ते १०
आनंद हा जन्मसिद्ध हक्क -बंडोपंत कुलकर्णी १५
हरि दिसे जनीं वनी आत्मतत्त्वीं (भाग ४) - डॉ. सुनील शिंदे १८
अध्यात्म ज्ञानाचे महत्त्व -बी. के. गायकवाड २१
आत्मविश्वास - नरेश यादव २४
आत्मा मालिक चैत्र महोत्सव २०२६ - नरेश यादव २७

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

# एकाग्रतेतील जागृतता



**संपादकीय**

मनापासून आपण दूर जाऊ शकत नाही. आंतरिक गोंधळ व मानसिक विवादांवर जागृतपणे लक्ष ठेवून मन शांत केले पाहिजे. मानसिक बदलाच्या प्रत्येक स्थितीवर लक्ष ठेवा. विकसित मन आनंदी व सुखी असते. दुर्लक्षित मन दुःखदायी व अनेक अडचणी निर्माण करीत असते. शिस्तबद्ध मन अतिशय कार्यक्षम व शक्तिशाली असते. बेशिस्त व इतस्ततः भटकणारे मन हे अकार्यक्षम व दुबळे असते. अश्व शिक्षक ज्याप्रमाणे घोड्यांना शिकवतो, तसे आपण मनाला शिकवले पाहिजे.

**-संत परमानंद महाराज**

**ए**काग्रतेतून निर्माण होणारी जागृतता म्हणजे ध्यान होय. एकाग्रता वाढविण्यासाठी ध्यानाची आवश्यकता आहे. स्मृती किंवा जागृतीच्या विकासासाठी आंतरिक अनुभूतींचे ध्यान आवश्यक आहे. एकाग्रतेचा वापर करून आपण जीवनात ध्यान उतरवू शकतो. आपल्या सर्व मानसिक शक्ती एकाग्र करून विखुरलेले मन एकचित्त करणे. संपूर्ण लक्ष एकाच ठिकाणी एकाग्र केले तर त्याचे सत्य स्वरुप जाणता येते. एकाग्रतेमधून मानसिक अवस्थेमध्ये हळूवार बदल होतात व मानसिक शक्ती विशिष्ट दिशेने केंद्रीत होते.

मन एकाग्र का करावे? एकाग्रतेमुळे मन शांत व स्थिर होते व शक्ती वाया जात नाही. इतकेच पुरेसे नाही तर प्रज्ञा प्राप्तीसाठी अत्यावश्यक गोष्ट आहे. स्वतःला खोलवर जाणण्यासाठी व जगाला सुस्पष्ट पाहण्यासाठी शांत व स्थिर मनाची गरज आहे. मानसिक एकाग्रतेच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर समधा मार्गदर्शक ठरते. यामध्ये काही मानसिक शक्ती प्राप्त होऊ शकतात. व्यस्त जीवनात हे कदाचित शक्य होणार नाही. मन वर्तमानात न राहता भटकत राहते. क्षणोक्षणी घटना घडतात. त्याकडे एकाग्रतेने पहा. प्रत्येक कृती लक्षपूर्वक व शांततेत करा. वर्तमानात जगा. एकाग्रतेसाठी भगवान बुद्धांनी जवळजवळ चाळीस विषय, मार्ग किंवा पद्धती दिलेल्या आहेत. जसे प्रगत होऊ तसे शरीर शिथिल व तणावमुक्त होईल. मन शांत होईल. श्वासोच्छवास हळूवारपणे होईल. कुठल्याही आंतरिक अथवा बाह्य अडचणीच्या वेळीसुद्धा आपण शांत व स्थिर राहू शकाल. दैनंदिन गोष्टी बाजूस सारून एकाग्र व्हा. पहाटेची वेळ यासाठी अतिशय योग्य आहे.

मनापासून आपण दूर जाऊ शकत नाही. आंतरिक गोंधळ व मानसिक विवादांवर जागृतपणे लक्ष ठेवून मन शांत केले पाहिजे. मानसिक बदलाच्या प्रत्येक स्थितीवर लक्ष ठेवा. विकसित मन आनंदी व सुखी असते. दुर्लक्षित मन दुःखदायी व अनेक अडचणी निर्माण करीत असते. शिस्तबद्ध मन अतिशय कार्यक्षम व शक्तिशाली असते. बेशिस्त व इतस्ततः भटकणारे मन हे अकार्यक्षम व दुबळे असते. अश्व शिक्षक ज्याप्रमाणे घोड्यांना शिकवतो, तसे आपण मनाला शिकवले पाहिजे.

शरीर किंवा काया, वेदना, भावना व धर्म किंवा मानसिक स्थिती या चार विषयांवरील एकाग्रतेमधून आंतरिक अनुभूती व बाह्य जगाचे दर्शन हे या ध्यानाचे कार्य होय. अतिशय सरळ, थेट व

परिणामकारकतेने व दैनंदिन अडचणींवर मात करून मनाला विमुक्तीच्या सर्वोच्च ध्येयाकडे घेऊन जाते. कुठल्याही स्वभावासाठी काही एक नुकसान न करता मनाला प्रशिक्षित करण्याचा सरळ मार्ग आहे. जागृतता ही सर्वसाधारण, सोपी व परिचित मानसिक स्थिती आहे. एखाद्या विषयाकडे तटस्थपणे कुठलेही मत न बनविता पूर्वग्रहदृष्टीने न पाहणे. कुठलेही आकर्षण अथवा तिरस्कार विरहित अवस्थेमधून तटस्थपणे शरीराकडे पाहणे. आपण म्हणजे शरीर हा दृष्टिकोन मानसिक शुद्धतेच्या काही पातळीवर दूर होतो.

योग्य स्थळ, वेळ व सोयीस्कर बैठकीने सुरुवात करावी. अतिशय शांतपणे नैसर्गिक श्वासोच्छवासाकडे जागृततेने पाहा. श्वास येत आहे व जात आहे. तटस्थपणे पाहा. अनेक विचार व कल्पना त्रास देत असतील तर आपण श्वास मोजू शकता व एकाग्रता वाढल्यावर अंक मोजणी थांबवा. आपले संपूर्ण लक्ष श्वासाचा स्पर्श नाकाच्या ज्या भागावर होतो, त्या स्पर्शबिंदूवर केंद्रित करा. श्वास जलद असेल, आपले शरीर ताठ व मन जागृत ठेवून स्तब्धपणे निरीक्षण करा. आपण जसे आपल्या स्वभावानुसार व मानसिकतेला अनुसरून व स्वतःच्या अनुभवाप्रमाणे एखादी पद्धत स्वीकारू शकता. गाईला दोरीने खुंटीला बांधतात, तसे विषय मनाला बांधावा. मनाला एकाच विषयावर केंद्रीत केल्याने ते शांत व तणावमुक्त होते. एकांतात मानसिक बदलांकडे पहा. बदलांचा विचार करू नका, त्यांना टाळू नका. मन लोभग्रस्त आहे तर जाणा. द्वेष आहे तर ओळखा, चंचल असेल तर ते पहा. स्वतः त्याच्याशी एकरूप न होता तटस्थ रहा. मन बाह्य जगावर केंद्रीत असते. त्यास स्वतःकडे वळवा. मनाचा स्वभाव जाणणे हे अतिशय कठीण काम आहे, तरीसुद्धा ते शक्य आहे, हा विश्वास असू द्या.

चांगले विचार मानसिक स्थितीवर कसे परिणाम करतात व वाईट विचार मानसिक स्थिती कशी बिघडवतात, त्याकडे अलिप्तपणे लक्ष द्या. विचारांच्या पलीकडे पहा. विचारांकडे लक्ष द्या. विचारांकडे लक्ष दिल्यामुळे शांती, आनंद व सुसंवाद निर्माण होतो. त्यामुळे विचारांची संख्या हळूहळू कमी होते. त्यामुळे मनात तेवढीच शक्ती व शांतता निर्माण होते. त्रयस्थपणातून दुष्ट विचारांवर कसा ताबा मिळवावा व चांगल्या विचारांना कशा प्रकारे विकसित करावे, हे लक्षात येईल.

**||आत्मा मालिक||**

**- संत परमानंद महाराज,**
संपादक

***



## बहिर्निष्ठ पूजा हे अंतर्निष्ठ पूजेचे प्रतीक

**विभिन्न देव-देवींना उद्देशून विभिन्न उपचारांद्वारा केल्या जाणाऱ्या पूजा-पद्धती भारतीय समाजात प्रचलित आहेत. त्यांद्वारा सामान्य माणसास आत्मतत्त्वात (म्हणजे माणसाला त्याच्या मूळ स्वरूपांत) उपनीत व्हावयाचे स्मरण होत राहील म्हणजे आत्मतत्त्वानुभूति हेच आपल्या सर्व धार्मिक कृती करण्यामागील परमकल्याणकारी व अंतिम ध्येय आहे हे त्याच्या मनावर संस्कारित होत राहील, या हेतूनेच ऋषीमुनींनी मूर्तिपूजा ही तुलनेत अगदीच स्थूल असलेली प्रतीकात्मक गोष्ट सुरू करून दिली आहे.**

**- डॉ. विजय बाणकर**

**आ**पल्या भारतीय समाजात राहणाऱ्या माणसांच्या मनावर वारंवार संस्कार करून त्यांना श्रेयस्कर म्हणजे मुक्तिदायी स्वधर्माचरण करण्यास सक्षम करणे व सक्षम ठेवणे हा ते संस्कार करण्यामागील मुख्य उद्देश होय. तो उद्देश सफल होत रहावा म्हणून प्रवृत्ती व निवृत्तीभावयुक्त मानवप्रकृतीचे म्हणजे माणसांच्या स्वभावाचे ज्ञान असलेल्या दूरदर्शी आत्मज्ञानी ऋषीमुनींनी व महात्म्यांनी नित्य कर्मे, चालीरीति, रूढी, परंपरा, धार्मिक विधी, तीर्थाटने, सण, उत्सव वगैरे सुरू करून ठेवले आहेत. त्या उद्देशाचे सार म्हणून उदा. दिवाळी या सणाचा रूढ व आध्यात्मिक अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न यापूर्वी एका लेखात केला आहे.

मूर्तिपूजा करणे व विविध तीर्थक्षेत्रांना भेटी देणे या धार्मिक गोष्टी सुरू करून ठेवण्यामागे जे यौगिक अनुभवज्ञानप्रधान प्रयोजन अभिप्रेत आहे ते श्रीश्यामचरण लाहिरीमहाराज यांनी आपल्या 'श्यामचरण क्रियायोग व अद्वैतवाद' या पुस्तकात अगदी सुस्पष्ट शब्दांत व सविस्तर समजावून सांगितले आहे.१ ते प्रयोजन समजून घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

बहिर्निष्ठ पूजा हे अंतर्निष्ठ पूजेचे प्रतीक होय -

विभिन्न देव-देवींना उद्देशून विभिन्न उपचारांद्वारा केल्या जाणाऱ्या पूजा-पद्धती भारतीय समाजात प्रचलित आहेत. त्यांद्वारा सामान्य माणसास आत्मतत्त्वात (म्हणजे माणसाला त्याच्या मूळ स्वरूपांत) उपनीत व्हावयाचे स्मरण होत राहील म्हणजे आत्मतत्त्वानुभूति हेच आपल्या सर्व धार्मिक कृती करण्यामागील परमकल्याणकारी व अंतिम ध्येय आहे हे त्याच्या मनावर संस्कारित होत राहील, या हेतूनेच ऋषीमुनींनी मूर्तिपूजा ही तुलनेत अगदीच स्थूल असलेली प्रतीकात्मक गोष्ट सुरू करून दिली आहे.

बाह्यपूजा करताना प्रथम एक घट स्थापन करतात. तो घट म्हणजे आपल्या देहरूपी घटाचे प्रतीक होय. विषिष्ट धातुचा हा घट पवित्र गंगा-जलाने भरतात. जल वा पाणी हे ब्रह्माचे (आत्म्याचे) प्रतीक

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

होय. पाण्याला कोणताही रंग, रूप वा आकार नसतो. ज्या पात्रात ठेवाल त्या पात्राचे रूप ते धारण करते. आपला आत्माही तसाच आहे. ज्या देहरूपी घटात अवस्थान करतो जणू तसे रूप तो धारण करीत असतो. सर्वसामान्य माणसाला देहरूपी घटात अवस्थित असलेल्या आत्मारूपी देवाची पूजा करण्याची रीत माहीत नसते. म्हणून मूर्तिपूजा करताना करावयाच्या विविध गोष्टींच्या क्रमाने आत्मारूपी खऱ्या देवाच्या पूजेत उपनीत व्हावे म्हणजे आत्मदेवाची पूजा करणे या आपल्या सर्वोत्तम ध्येयाची आठवण त्याला होत रहावी, या हेतूनेच एखाद्या धातूपासून वा मातीपासून वा अन्य प्रकारे तयार केलेल्या बाह्य घटाची व्यवस्था केली जात असते.

या घटावर आंब्याची पाच पाने विशिष्ट प्रकारे ठेवली जातात. पाच पाने ही आपल्या देहांत असलेल्या मुख्य पाच प्राणांचे प्रतीक होय. प्राण, अपान, व्यान, उदान व समान हे पंच प्राण देहरूपी घटात वेगवेगळ्या ठिकाणी राहून देहाला परिचालित करीत असतात म्हणते देहात घडणाऱ्या विविध हालचाली त्यांच्यामुळे घडत असतात. एक प्रकारे हे पंचप्राण आत्मारूपी देवाची आरती करीत असतात. म्हणूनच उदा. 'पंचप्राणांची आरती' हे वा या अर्थाचे आपापल्या भाषेतील शब्द लोक उच्चारीत असतात. पण खरे योग-साधक जी पंचप्राणांची आरती करीत असतात त्या आरतीची रीत सर्वसामान्य माणसास माहीत नसते. त्या अंतर्निष्ठ आरतीचे स्वरूप संत श्रीरोहिदास (संत श्रीरविदास) यांनी वर्णिले आहे. (ती आरती संदर्भ क्रमांक एक म्हणून उद्धृत केली आहे.) सदर आरतीत त्यांनी शेवटी म्हटल्याप्रमाणे तशी आरती करतो तोच मुक्त होत असतो किंवा भवसागराच्या पार जात असतो.२ मुक्त होणे हा चौथा म्हणजे मुख्य पुरुषार्थ लोकांनी साधावा व त्यासाठी त्या पंचप्राणयुक्त उपासनेकडे लोक आकर्षित व्हावेत म्हणून, श्रीश्यामचरण लाहिरी महाराज म्हणतात, की ऋषींनी पंचफलयुक्त आम्रपल्लवाची व्यवस्था केली आहे.

मूर्तिपूजा करताना योजिले जाणारे धूप, चंदन हे सुगंधाचे प्रतीक होय. देहरूपी घटांत अवस्थित असलेल्या पंचप्राणांसह यौगिक कर्म करीत असताना योगसाधकास स्वत:च्या आतच अनेक प्रकारचे सुगंध दरवळत असल्याचे अनुभवास येत असते. अर्थात, धूप, चंदन हे त्या देहाभ्यंतरस्थ सुगंधाचे प्रतीक होय. सर्वसामान्य माणसास देहाभ्यंतरस्थ सुगंधाकडे आकर्षित करून त्या दिव्य सुगंधाचे स्मरण त्यांच्या अंत:करणात सदैव जागृत रहावे म्हणून धूप, चंदन या बाह्य उपायांचा अवलंब ऋषीमुनींनी करून ठेवला आहे. (कृपया पुन्हा पहा 'गुण व अवगुण' या पूर्वप्रकाशित लेखांतील 'सुमनसुगंधु रे भ्रमरा' या संत श्रीज्ञानदेवांच्या या मार्गदर्शक शब्दांचे विवरण.)

बहिर्निष्ठ म्हणजे बाह्य मूर्तिपूजेत शंख, काश्याची घंटा इत्यादिं वाद्यांचे ध्वनी वाजविले जातात. हे ध्वनी एखाद्या वाद्याच्या सहाय्याने निर्माण केले जातात म्हणून ते आहत (हाताने आघात करून होणारे) ध्वनी होत. याउलट योगकर्माद्वारा आपल्या देहांतच विभिन्न प्रकारचे ध्वनी होत असल्याचे योगसाधकाच्या अनुभवास येत असते. अर्थात योगसाधक हे अनाहत ध्वनी आपल्या आंत आपोआप निर्माण होत असल्याचे अनुभवून पुढे जात असतो. योगिराज श्रीश्यामचरण लाहिरी महाराज म्हणतात, की अपान वायू जेव्हा हृदयस्थित प्राणवायूत मिसळतो तेव्हा दहा प्रकारचे अनाहत शब्द (नाद)

आपोआप श्रुतिगोचर होतात म्हणजे योगसाधकास ऐकावयास मिळतात. हे अनाहत नाद स्थूल कानांना ऐकू येत नसतात. चिं हा प्रथम नाद होय तर चिं चिं हा द्वितीय नाद होय. तिसरा क्षुद्र घंटा नाद, चौथा शंख नाद, पाचवा बिन म्हणजे वीणा नाद, सहावा ताल नाद, सातवा बासरी किंवा मुरली नाद, आठवा पखवाज किंवा मृदंग नाद, नववा सनई नाद व दहावा दीर्घ घंटा नाद. हे दहा प्रकारचे अनाहत म्हणजे विना आघाताने होणारे नाद होत, हे त्यांचे वैशिष्ट्य श्रीलाहिरी महाराज यांनी अनेकदा उल्लेखिले आहे. प्राणाच्या चंचलतेमुळे हे नाद (ध्वनी) निर्माण होत असतात आणि उत्तम प्राणकर्म वा आत्मकर्म करीत राहिले की प्राण स्थिर होतात तेव्हा ते ध्वनी राहात नाहीत. (संत श्रीकबीर यांनीही एका दोह्यात 'शून्य अजपा अनाहत हे सारे मरुनी जाती। रामभक्त न मरे कधीही, समजून घे ही गती।।' असे साधकांना अधिक आध्यात्मिक प्रगती करावयाची प्रेरणा देणारे विधान करून ठेवले आहे.३) सर्वसामान्य माणूस हे आत्मकर्म वा यौगिक कर्म करीत नसतो म्हणून तो त्याच्या देहांत होत असलेल्या अनाहत नादांप्रति आकृष्ट व्हावा या हेतूने बाह्य पूजेतही अनेक सुमधूर वाद्यांची योजना ऋषींनी करून ठेवली आहे.

बाह्यपूजेत बिल्वपत्र लागते. ते त्रिफळयुक्त असते. त्रिफळ हे सत्त्व, रज व तम या तीन गुणांचे प्रतीक आहे. हे तीन गुण प्रत्येक माणसांत असतात. बिल्वपत्र मूर्तिच्या चरणीं प्रदान केले जाते. तसे करणे हे, उत्तम प्राणकर्माद्वारा म्हणजे यथोचित योगसाधना करून आपल्या देहातील तिन्ही गुण (आत्म)देवाला अर्पण करणे, या आंतरिक पूजेचे प्रतीक होय. तिन्ही गुणांचा त्याग केल्याशिवाय व पर्यायाने त्रिगुणातीत झाल्याशिवाय (आत्मारूपी) देव भेटत नसतो. या सर्वोच्च पारमार्थिक तत्त्वाचे स्मरण मूर्तिला त्रिफळयुक्त बिल्वपत्र समर्पित करताना होत रहावे म्हणून ऋषींनी तशी व्यवस्था करून ठेवली आहे.

बाह्यपूजेसाठी फूल लागते. फूल सुंदरतेचे प्रतीक आहे. आत्मा चिरसुंदर आहे. ती चिरसुंदरता आपल्याला ज्या उपायाने प्राप्त करून घेता येईल त्या एकमेव उपायाचे प्रतीक म्हणजे म्हणजे देवमूर्तिला फूल वाहणे हा होय. बाह्यपूजेत एखादे स्वादिष्ट फळ लागते. योगीभक्त दीर्घ योगाभ्यासाद्वारा आत्मारूपी फळ प्राप्त करून घेतो. अर्थात बाह्यपूजेतील फळ हे सर्वश्रेष्ठ आत्मफळाचे प्रतीक होय. हे स्वादिष्ट फळच प्रसाद म्हणून गणले जाते. सत्यात म्हणजे खऱ्या अर्थाने शांतीच प्रसाद होय. दीर्घ योगाभ्यासाद्वारा शांती म्हणजे अंतःकरणाची स्थिरता (परब्रह्मस्वरूप) प्राप्त होते. बाह्य पूजेतील स्वादिष्ट फळरूपी प्रसाद हे त्या परब्रह्मस्वरूप शांतिलाभाचे प्रतीक होय.

थोडक्यात, श्रीलाहिरी महाराज म्हणतात की, बाह्य पूजेत ज्या उपचार सामग्री आहेत त्या सर्व सहजलभ्य आहेत. त्यामागील उद्देश हाच की आत्मसाधनेसाठी व आत्मसाधना करण्यासाठी ज्याचे प्रयोजन व ज्या समस्त अवस्थांकडे योग्याला सन्मुखी होता येते ते सर्व त्याच्या व सर्वांच्या आंत आहे. अंतर्मुख होऊन सर्वांना हे जाणता येईल. हा अंतर्मुखी भाव जागृत होऊन माणूस चूडांत म्हणते सहस्त्रदलकमलांत प्रतिष्ठीत व्हावा या हेतूने ऋषींनी तीर्थगमन, बाह्यपूजा, जप, तप, उपवास व बाह्य उपायांचे अवलंबन केले. माणूस आत्मतत्त्वाकडे वा आत्मज्ञानाकडे प्रवृत्त झाला की तो दुःखमुक्त वा

सर्वसुखी होतो. पण सर्वच माणसे आत्मज्ञानाची कथा समजत नसतात, ते ती कथा म्हणजे आतमदेवदर्शन होण्यासाठी करावयाच्या योगसाधनेची रीत ते जाणूही इच्छित नसतात. त्यांना मूळ तत्त्वाकडे म्हणजे आत्मारूपी देवाकडे आकृष्ट करण्यासाठी तीर्थगमनाची, दुर्गापूजा, शिवपूजा, विष्णुपूजा इत्यादि मोठ्या पूजांचे आयोजन केले आहे. अशाप्रकारे, मानवकल्याणाची तळमळ असलेल्या ऋषीगणांनी संसाररत असलेल्या माणसांना आत्मतत्त्वाचे (ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच ओवीत उल्लेखिलेल्या आत्मरूप देवाचे)४ स्मरण होत रहावे म्हणून त्याकडे जाताना अनुभवास येणाऱ्या व करावयाच्या अंतर्निष्ठ योगसाधनेतील कृतींची प्रतीके ज्यात समाविष्ट आहेत अशा बहिर्निष्ठ पूजादि धार्मिक गोष्टी वा चालीरीति सुरू करून ठेवल्या आहेत.

* * * * *

**संदर्भसूची -**

१. श्यामचरण क्रियायोग व अद्वैतवाद, मूळ बंगालीतून अनुवादीत, अनुवाद : सुकन्या कुलकर्णी, प्रकाशक : आलोक चटर्जी, योगिराज पब्लिकेशन, ऊषालोक, २६ए/९, एस्. बी. नियोगी गार्डन लेन, कलकत्ता - ७०००३६ (प्रथम आवृत्ती, २००३)

२. मोक्षदायी अंतर्निष्ठ आरतीचे स्वरूप संत श्री. रोहिदास (रविदास) यांनी पुढीलप्रमाणे वर्णिले आहे : गगन मंडलमें आरती कीजै, नाद बिंद इक मेक करीजै। सुसमन इंदु अमृत कुंभ धरावै, मनसा माला फूल चढावे।।१।। घीव अखंडा सोहे बाती, त्रिकुटी जोत जलै दिन राती। पवन साधना थाल सजीजै, तामैं चौमुष मन धरि लीजै।।२।। रवि ससि हाय गहौ तिंह माहीं, षिण दहिने षिन बामै लाहीं। सहस कंवल सिंघासन राजै, अनहद झांजन नित ही बाजै।।३।। इंह विध आरती सांची, सेवा, परम पुरिष अलख अभेवा। कहै 'रविदास' गुरुदेव बतावे, ऐसी आरती पार लंघावै।।४।।

३. मूळ दोहा : शून्य मरै, अजपा मरै, अनहदहू मरि जाय। रामसनेही ना मरै, कह कबीर समुझाय।।

४. ॐनमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या। जयजय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।, अशी ती ओवी आहे.

**- डॉ. विजय बाणकर,**
बी - ११०९, ग्रासलँड हाऊसिंग सोसायटी,
मु. कोल्हेवाडी, पो. खडकवासला (आर. एस.),
सिंहगड रोड, पुणे - ४११०२४
(मो. फोन क्र. : ९३२५५८८०९५)

***

## नामदेवांचे अभंग आत्मचरित्र भाग ६



एका हाती विणा व मुखात श्रीहरीचे नाम असे गात मी देऊळात गेलो. अन्नपाणी सोडले. देवाचे ध्यान लागले, माता, पिता, पुत्र, पत्नी यांची मला आठवणही होत नाही. माझा देहभावच गेला. हरिचा छंद लागला. भगवंताची चरणप्राप्ती व्हावी हीच माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे. हे देवा, अनेक अपराध हीच माझी कमाई आहे. तू पतितपावन आहेस. माझे अपराध माफ करून तू माझा उद्धार कर. माझे मन तुझ्या चरणी सतत राहू दे. मी फक्त तुलाच शरण आलो आहे. त्यामुळे मला तू आणि सद्‌गुरू भेटले.

**-नामदेव सदावर्ते**

**सं**त नामदेव आपल्या अभंग-आत्मचरित्रात आर्ततेने विठ्ठलाची प्रार्थना करतात. विठ्ठलचरणी नम्र होताना ते म्हणतात, ब्रह्म अविनाश व आनंदघन आहेत, असे संत सांगतात पण त्याहूनही विठ्ठलचरण गोड व श्रेष्ठ आहे. ते श्रीहरिचरण मी सोडणार नाही. आत्मज्ञानसंपन्न जनाच्या ध्यानात विठ्ठलचरण येत नाही. मला मात्र त्या चरणांचीच आवड आहे.

हे देवा, तुझ्या चरणांचे अनुसंधान सुटताच माझे प्राण तत्क्षणी जातील, मग ते ब्रह्मज्ञान कुणाला सांगू? माझ्या मुखातील नामजपात जर खंड पडला तर माझ्या जिभेचे शंभर तुकडे होतील. ते म्हणतात- तुझे ते सावळे, सुंदर रूप माझ्या दृष्टीला पडले नाही तर माझे डोळे दृष्टीहीन होतील. विटेवरील त्या समचरणांचा मला ध्यास लागला आहे. हे देवा, माझी फक्त तुझ्यावरच श्रद्धा आहे. तू सत्याचा साह्यकर्ता आहेस.

**नामा म्हणे माझा सत्याचा साह्यकारी।**
**आस मी न करी आणिकांची।**

हे देवा, माझ्या मनाने तुझ्या चरणी बुडी दिली आहे. त्यामुळे इतर सर्व इंद्रिये वेडी झाली आहेत. त्या इंद्रियांना विषयच सापडत नाही, त्यामुळे त्या इंद्रियांना सुख भोगायला मिळत नाही. माझा देह सहजस्थितीत निष्काम झाला आहे. देवावरील माझे प्रेम ओसंडून वाहत आहे.

**नामा म्हणे देवा भक्तजन वत्सला ।**
**क्षण जीवावेगळा न करी मज।**

हे देवा, आता जे व्हायचे ते होवो, मी तुझे चरण सोडणार नाही, हृदयात सतत तुझे ध्यान व वाचेने तुझा नामजप हाच माझा नित्यनेम आहे. हीच माझी उपासना आहे. माझे मन तुझ्या पायी स्थिर झाल्याने विषय माझ्या शरीरात ताडातोड करतात. हे देवा, मला वासनेचा संग देऊ नको. काम, क्रोध, लोभ, मद, अहंकार हे सारे वैरी माझ्या पाठीमागे लागले आहेत. तू मला त्यांच्या हाती देतोस. नामदेवराय म्हणतात-

**देह जावो हेंचि घडी। पाय हरिचे न सोडी ।।**
**क्लेश होत नानापरी। वाचे राम कृष्ण हरि ।।**
**नाचूं वैष्णवांचे मेळीं । हांक विठ्ठला आरोळी ।।**
**नामा म्हणे विठोबासी। जें तें घडो या देहासी ।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

भगवंताचे चरणी माझे सर्व भाग्य असून, इतर काहीही आम्ही मागत नाही. पक्षी आला व चोचीत चारा-दाणे घेऊन गेला. आम्ही बाजारकरी बाजारात गेलो. व्यवहार झाल्यावर पुन्हा स्वतःच्या गावी आलो.

**नामा म्हणे नमूं सर्व जीव जंत।**
**दिसे ते अनंत दृष्टीपुढे ।।**

हे पांडुरंगा, आम्ही तुला किती वेळा विनवणी करावी. काय आमच्या नशिबात तू लिहून ठेवले आहे? हे देवा, तू माझा त्याग का केला आहेस? तू त्रिभुवनात श्रेष्ठ आहेस. तूच त्रैलोक्याचा धनी आहेस. सर्व पृथ्वीचा भार तू तुझ्यावर घेतला आहेस. मग माझ्यावर तू कृपा का करीत नाहीस. ते म्हणतात-

**नको अंत पाहूं पांडुरंगे आई।**
**नामा विठोपायी मिठी घाली ।।**

हे देवा, मी तुझे गाणे गातो म्हणून लोक माझे कौतुक करतात. जन्माला आल्यापासून मी तुझा दास आहे. आता तू माझी लाज राख. मायामोहांनी मला दूर सोडले. संसार प्रपंच मी सोडून दिला. नातेवाईक आप्तेष्ट सर्वांपासून मी दुरावलो आहे. तसाच येऊन तुझ्या चरणांजवळ मी तल्लीन झालो. षडरिपूंनी मला सोडले. मीपणास मी मुकलो.

**नामा म्हणे तुझ्या चरणांची आवडी।**
**लागली न सोडी चित्त माझे।।**

एका हाती विणा व मुखात श्रीहरीचे नाम असे गात मी देऊळात गेलो. अन्नपाणी सोडले. देवाचे ध्यान लागले, माता, पिता, पुत्र, पत्नी यांची मला आठवणही होत नाही. माझा देहभावच गेला. हरिचा छंद लागला. भगवंताची चरणप्राप्ती व्हावी हीच माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे. हे देवा, अनेक अपराध हीच माझी कमाई आहे. तू पतितपावन आहेस. माझे अपराध माफ करून तू माझा उद्धार कर. माझे मन तुझ्या चरणी सतत राहू दे. मी फक्त तुलाच शरण आलो आहे. त्यामुळे मला तू आणि सद्‌गुरू भेटले. वेद जाणणाऱ्या विद्वान, वेदसंपन्न व्यक्तींना मी भेटलो. तर त्यांच्याजवळ सर्वत्र विधीनिषेध पसरलेले दिसले. वेद-ज्ञानामुळे ते सर्वजण अहंकारी झालेले दिसले. त्यांना सोडून मी शुद्धभावाने, नम्रतेने तुझे नामस्मरण व मुखाने तुझ्या नामाचा जप केला तसेच माझ्या मूळ स्वरूपाची ओळखी व्हावी म्हणून शास्त्रज्ञांकडे गेलो. त्यांना पाहताच तेथे भेदाभेद व द्वैत आढळले. ते आपसांतच भांडत होते. ते सर्वजण मला संभ्रमित व गर्विष्ठ झालेले दिसले. नंतर मी पुराणिकांकडे गेलो. पण ते सर्व अशांत, अस्थिर व संभ्रमित दिसले.

**विषयी ठेऊनि मन सांगती ब्रह्मज्ञान।**
**तेणे समाधान नुपजे कदा ।।**

हरिदासांना भक्ती कशी करावी हे विचारता मला त्यांच्याकडेच प्रेम-भाव नाही, हे कळले. हरिदास कीर्तनात नामाचे महत्त्व सांगतात, पण सर्वकाळी त्या हरिदासाचे मन विषय वासनेत रमलेले दिसले. मी खूप थकलो व शेवटी पांडुरंगास शरण गेलो. नामदेवराय म्हणतात-

**भयभीत जालो संसारी येरझारी।**
**शिणलो असे भारी तारी मज।।**
**नामा म्हणे आता हिंडता कष्टलो।**
**म्हणोनि शरण आलो पांडुरंगा।।**

नामदेवराय म्हणतात, हे देवा मी या संसारात खूप गांजलो, थकलो, दुःखी झालो. तू आमची कळिकाळाची भीती घालवशील याची खात्री होती. आणि शरण आलेल्या भक्तांचे तू गुणदोष पाहत

नाहीस. म्हणून तुझ्या नामस्मरणावर दृढ विश्वास बसला. हे देवा, सर्वस्व अर्पण करून आम्ही तुला शरण आलो आहोत. आम्ही वासनेचा त्याग केला. आम्ही आमचा देह, वाचा, चित्त, मन, धनसंपत्ती सर्व तुझ्या चरणी अर्पण केले आहे. आमच्या मनात तुझ्याबद्दल प्रेम, आदर, भक्ती आहे. हे देवा, तू भक्ताने अर्पण केलेले स्वीकारतो, पण भक्तांना तू फसवतोस. या देवाने ध्रुवाला, बिभिषणाला, उपमन्युला सहज फसविले. आपल्या चरणी त्यांना ठाव दिला नाही. आत्मज्ञान, वैकुंठ दिले नाही.

**अज्ञान बाळकु ठकविला धुरू।**
**तैसा भी अधिक नव्हे देवा।।१।।**
**लंकापति केला तुवा बिभीषण।**
**झालासी उत्तीर्ण वाचा ऋणे ।।२।।**
**उपमन्ये घेतला दुधाचाचि छंद।**
**तैसा बुद्धिभेद नव्हे जाण।।३।।**
**नामा म्हणे तैसा मी नव्हे अज्ञान।**
**माग तूज देईन शरीर माझे।।४।।**

अशा या फसविणाऱ्या श्रीहरीने अनेकांना फसविले आहे. हिरण्यकश्यपूने देवाशी वैर केले म्हणून त्याने लहानग्या स्वतःच्या बाळाला खूप त्रास दिला. तशाच त्या गोपिकांनी आपल्या पतीचा, पुत्राचा स्नेह सोडून कृष्णावर प्रेम केले. पण देवांनी त्या गोपिकांचा त्याग केला. नामदेव म्हणतात.

**तुझा माझा देवा का रे वैराकार।**
**दुःखाचे डोंगर दाखविशी ।।**
**बळे बांधोनिया देसी काळा हाती।**
**ऐसे काय चित्ती आलें तुझ्या ।।**

हे देवा, तू आजपर्यंत अनेक आर्त भक्तांना फसविले आहे. मी मात्र तसा फसणारा नाही. चौऱ्यांशी लक्ष जन्मांत मी तुझी भक्तीभावाने सेवा केली. त्या सेवेच्या मोलाचा आपण हिशेब करा. माझा तो ठेवा मला दे.

**नामा म्हणे मज खवळिसी वाया।**
**पिसाळलो तरी सेंवेन तुझ्या पाया।।**

हे देवा, पूर्वी अनेक जन्मांत मी तुझी सेवा केली. कोणत्याही जन्मात तुझ्याकडे काहीच मागितले नाही. विषाचा प्रभाव क्षणात नष्ट करणारे तुझे नाम श्रेष्ठ आहे. देवा तुझे नाम अमृतालाही संजीवन देणारे आहे.

**पंढरीनिवासा सख्या पांडुरंगा।**
**करी अंगसंगा भक्तांचिया।।१।।**
**भक्त कैवारिया होसी नारायणा।**
**बोलता वचना काय लाज ।।२।।**
**मागे बहुतांचे फेडियेलें ऋण।**
**आम्हांसाठी कोण आली धाड ।।३।।**
**वारंवार तुज लाज नाही देवा।**
**बोल रे केशवा म्हणे नामा ।।४।।**

हे देवा, तू कृपाळू उदार आहे असे सांगतोस, तर मग त्या रावणाला तू का ठार मारलेस? रोज नित्यनेमाने तो स्वतःच्या शिरकमळांनी तुझी पूजा करीत होता. तरीही तू त्यास का मारलेस? तुझा मोठेपणा आम्हाला

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**



सारा ठाऊक आहे. कर्णासारख्या वीर, उदार व पराक्रमी राजाला बाण मारून ठार केलेस. त्याला प्रथम रथातून खाली जमिनीवर पाडले व त्याक्षणी त्याचे सोन्याचे दात पाडले व ते दान म्हणून स्वीकारले. मग त्यास बाण मारून ठार केले. हे देवा, तू त्या सात्विक श्रीयाळ राजाच्या लहान पोरास खाल्ले. तुझ्यासारखा कठोर दुसरा कोणी नाही. त्या पोराचे मुंडके त्याच्या आईस कांडायला सांगितले, असा तू निर्दयी आहेस. त्या हरिश्चंद्र राजाचे सर्व राज्य घेतले. त्यास कुटुंबासह छळले. त्याचे पोर व बायको विकून डोंबाघरी चाकरी करावयास लावले. असे अनेकांना तू देशोधडीस लावले. असे तुझे अनेक प्रताप सांगता येतील. तू तुझ्या मावशीला फजित करून ठार मारले. तू तुझा मामासुद्धा ठार मारला. एवढे असूनही तू स्वतःला उदारांचा राणा समजतोस.

**उदारांचा राणा म्हणविसी आपणां ।**
**सांग त्वां कवणां काय दिल्हे ।।**

हे देवा, तुझे सारे वर्म आम्हाला माहीत आहे. सांगू नये पण तुझी वर्मे सांगतो, त्याबद्दल देवा, मला क्षमा करा. तुला जर कुणाला काही द्यायचे असेल, तर तू त्याचे काहीतरी घेतो. सुदामा नावाचा गरीब ब्राह्मण दारिद्र्याने त्रस्त झाला व प्रपंचास मदत व्हावी म्हणून देवाकडे गेला. मूठभर पोहे त्याच्याकडून हिसकावून घेतले. मग त्यास उत्कृष्ट भाग्य दिले. तसेच अज्ञातवासाच्या काळात पांडवांना छळण्यासाठी दुर्वास ऋषी शिष्यांसह पांडवांकडे भोजनासाठी आले, तेव्हा द्रौपदीने देवाचा धावा केला. त्यावेळी देव आले व भूक लागली म्हणून द्रोपदीकडून भाजीचे पान खाऊन ढेकर दिला व मग दुर्वासांना देवांनी अन्न दिले. तसेच हे देवा, बिभीषणाला सोन्याची नगरी दिली, असे सर्व वर्णन करतात. पण वैऱ्याचे घर भेदून त्याची लंका त्याला दिली. यात तू काय नवल केले. नामदेवराय म्हणतात-

**माझे सर्वस्व घेई तुझें नको काही।**
**मनोश्याची नाही चाड् मज।।**
**नामा म्हणे केशवा जन्मजन्मांतरी।**
**ऋणी करीन हरी ऋणे सेवा।**

हे देवा, फक्त तुझीच निंदा किंवा स्तुती करावी, पण कुणाचे गुण-दोष पाहू नये. तसेच मैत्री किंवा वैर तुझ्याबरोबरच करावे. पण तुझा विसर पडू नये.

हृदयी हरी जपावा. गोपाळांप्रमाणे दास्यभक्ती करावी. जगणे किंवा मरणे तुझ्या दारीच घडावे. माझे मन जेथे जाईल, तेथे तेथे तुझेच रूप असावे. नामदेवराय म्हणतात-

**माता पिता बंधु कुलगुरू दैवत।**
**सखा सर्व गोत केशीराजा।।**

एका अभंगात नामदेवराय म्हणतात, हे देवा, आमच्या जवळ धनसंपत्ती नाही मग आम्ही काय दान देणार? आम्ही काही देत नाही म्हणून सर्वलोक आमचा भिऊन त्याग करतात. आमच्या दारिद्र्याचे गुण काय सांगू? देवा आता तूच मार्ग दाखव. त्या मार्गानेच आम्ही तुझ्या मागे येऊ.

नामदेवराय म्हणतात-

**उबगती सोयरी धायरी समस्त।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**काय करू अंत पाहसी माझा।।**

हे देवा, तूच माझी आई-बाप, बंधू, गुरू असून, मी तुलाच शरण आलो आहे. कंजुष माणसाचे धन जमिनीत खोलवर पुरलेले असते. मात्र, त्या माणसाचे चित्त जेथे धन पुरलेले आहे, तेथे वारंवार जाते. तसे माझे सर्वस्व तुझ्या चरणीच आहे. माझे चित्त त्या चरणांपाशी पुन्हा पुन्हा जावो.

**जेथे जेथे मन जाईल हे माझे।**

**तेथे तेथे तुझे रूप भासे।।**

आणि जर तुझ्या चरणांचे अनुसंधान तुटले तर ते लपलेले षडरिपू माझे चित्त व मन घेऊन जातील. माझे मन कामक्रोधादिंनी स्वतःच्या अधीन करून घेतल्यावर तू मला कधी भेटणार? माझे चित्त विषय वासनेच्या अधिन होऊ नये. हे देवा, माझे अज्ञान बालकाचे बोबडे बोल आपण चित्त देऊन ऐकावे. संगीतकला माझ्याकडे नाही. मला गोड आवाजाचा गळा नाही. ज्याला गाता येईल त्यानेच गावे. बाकीच्या भक्तांनी हरीहरी म्हणावे. केवळ नामस्मरण करावे.

**तान मान नेणे देवा । नामा विनविती केशवा ।।**

हे देवा, तू समर्थ असूनही भक्तांना त्रासदायक जिणे का देतोस? भक्तांना गांजणारी तुझी करणी आहे. आम्ही तुझ्यासाठी कष्ट सोसले. रामावतारात तुम्ही वल्कले धारण करून तापसी रुपात जंगलात आलात. आम्हाला माकडांचा वेश दिला. तुमची पत्नी हरविल्यावर आम्हीसुद्धा शोक करीत वनात हिंडत होतो. तुम्ही एका ठिकाणी बसून राहिलात व आम्ही माकडे मोठमोठे दगड डोक्यावर वाहत होतो. लंकेपुढे आम्ही लढाई केली. तुम्ही लांबून बाण मारले. रावणास ठार मारल्यानंतर आपण सारे अयोध्येत गेल्यावर तुम्हाला सिंहासन मिळाले, वस्त्रालंकार मिळाले व आम्ही उघडे उड्या मारीत होतो. तुमचे काम संपले व तुम्ही आम्हाला विसरलात. असे तुम्ही निष्ठूर आहात. कृष्णावतारात कंसामुळे तुम्ही गोकुळात गाई राखल्या. तेव्हा आम्ही तुमचे सवंगडी होतो. आपण एकत्र शिदोरी खात होतो. आपण खेळताना यमुनेच्या डोहात बुडी मारली. आम्ही सारे यमुनाकाठावर रडत बसलो. तुम्ही आम्हाला सतत दूर ठेवले.

**नामा म्हणे आम्ही पाईक फुकाचे।**

**धारक नामाचे दास तुझे ।।**

आम्ही अनेक जन्मांत तुमच्या चरणांचे भक्त आहोत. तुमच्या सहवासात अनेक जन्मापासून आम्ही आहोत. नामस्मरण भक्ती, हरिकीर्तन करीत आम्ही आमचे जीवन कृपाप्रसादासह कृतार्थ करीत आहोत. संत नामदेवांना वंदन!

**- नामदेव सदावर्ते,**

पसायदान बंगला, मानकर मळा,

मखमलाबाद, नाशिक

***



## आनंद हा जन्मसिद्ध हक्क

प्रेयस ही एक सामान्य प्रवृत्ती आहे. लोक एकमेकांना खूश ठेवण्यासाठी गोड बोलतात, स्तुती करतात आणि वास्तव लपवतात. स्वार्थ, भीती, सामाजिक दबाव किंवा स्वीकार मिळवण्याची इच्छा वगैरे अनेक कारणे यामागे असतात. परिणामी, व्यक्तीभोवती एक भ्रमाचे आवरण तयार होते, ज्यामध्ये त्याला स्वतःचे दोष दिसत नाहीत. हीच स्थिती दीर्घकाळ राहिली, तर व्यक्ती वास्तवापासून दूर जाते आणि चुकीचे निर्णय घेते.

-बंडोपंत कुलकर्णी, पुणे

मानवी जीवनाचा केंद्रबिंदू 'आनंद' हा आहे, ही गोष्ट सर्वमान्य आहे; परंतु हा आनंद नेमका कुठे आहे, कसा मिळतो आणि त्यासाठी कोणत्या मार्गाचा स्वीकार करावा लागतो, हा प्रश्न मात्र अत्यंत गुंतागुंतीचा आहे. जो माणूस पैसा, प्रतिष्ठा, संबंध, यश, भौतिक सुखसुविधा, यामध्ये तो स्वतःला गुंतवून घेतो, ते माणूस आनंदाच्या शोधात बाह्य जगात धावतो. काही काळासाठी भौतिक गोष्टी समाधान देतात, परंतु त्या टिकाऊ नसतात. परिणामी, आनंदाचा शोध हा एक अखंड धावपळ बनते. याच संदर्भात 'हितकारक सत्य' ही संकल्पना महत्त्वाची ठरते. कारण खरा आनंद हा केवळ सुखद अनुभूतीत नसून, सत्याच्या स्वीकारात आणि त्यातून होणाऱ्या आत्मपरिवर्तनात दडलेला आहे. परंतु विरोधाभास असा आहे की हेच सत्य अनेकदा 'अप्रिय' वाटते. म्हणूनच माणूस त्यापासून दूर पळतो आणि तात्पुरत्या प्रिय गोष्टींमध्ये अडकून राहतो. मानवी मनाची एक मूलभूत प्रवृत्ती म्हणजे सुखाकडे झुकणे आणि दुःखापासून दूर राहणे. ही प्रवृत्ती जैविक आणि मानसिक दोन्ही स्तरांवर कार्यरत असते. त्यामुळे जे काही गोड, सुखद, प्रशंसात्मक किंवा अहंकाराला पोषक असते, ते सहज स्वीकारले जाते. याउलट, जे काही टीकात्मक, कठोर किंवा आपल्या उणिवा दाखवणारे असते, ते आपोआप नाकारले जाते. 'प्रिय' म्हणजे जे त्वरित आनंद देते, तर 'पथ्य' म्हणजे जे दीर्घकालीन हित साधते. हा संघर्ष प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात सतत चालू असतो. अनेक वेळा माणूस 'प्रिय' निवडतो, कारण त्यासाठी कमी प्रयत्न लागतात आणि त्वरित समाधान मिळते. पण दीर्घकाळात यामुळे त्याची प्रगती थांबते. उलट 'पथ्य' मार्ग कठीण असतो, कारण त्यात आत्मपरीक्षण, संयम आणि बदलाची तयारी आवश्यक असते.

हितकारक सत्य या संकल्पनेचा गाभा याच ठिकाणी आहे. सत्य हे केवळ तथ्य नसते, तर ते माणसाच्या जीवनाला योग्य दिशा देणारे तत्त्व असते. परंतु हे सत्य जर आपल्या अहंकाराला धक्का देणारे असेल, तर ते स्वीकारणे कठीण जाते. उदाहरणार्थ, एखाद्याने आपली चूक दाखवली, तर लगेच बचावात्मक प्रतिक्रिया येते. काही वेळा मौन प्रतिक्रिया येते. मी चुकीचा नाही, तुम्हीच चुकीचे आहात, किंवा तुम्हाला माझ्याबद्दल काहीच माहिती नाही या त्या प्रतिक्रिया असतात. ही प्रतिक्रिया मनाच्या संरक्षण यंत्रणेचा भाग आहे. कारण मनाला स्वतःची प्रतिमा टिकवून ठेवायची असते. त्यामुळे सत्य नाकारले जाते, जरी ते आपल्या भल्यासाठी असले तरी. यामुळे माणूस स्वतःच्या मर्यादांमध्येच अडकून राहतो आणि

आत्मविकासाची प्रक्रिया थांबते. याच संदर्भात हितकारक सांगणारा आणि ऐकून स्वीकार करणारा यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. सत्य सांगणे हे धैर्याचे काम आहे, कारण त्यातून नातेसंबंध बिघडण्याची शक्यता असते. अनेकजण उगाच वाद नको, म्हणून गप्प बसतात किंवा गोड बोलून परिस्थिती टाळतात. पण यामुळे समोरच्या व्यक्तीचे खरे भले होत नाही. दुसरीकडे, सत्य ऐकणारा देखील दुर्मिळ असतो. कारण त्यासाठी अहंकार बाजूला ठेवावा लागतो आणि स्वतःच्या चुका मान्य कराव्या लागतात. हे दोन्ही गुण म्हणजे सत्य बोलण्याचे धैर्य आणि सत्य ऐकण्याची नम्रता एकत्र आले, तरच व्यक्तीच्या जीवनात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडते.

समाजरचनेच्या दृष्टीने पाहिले, तर प्रेयस ही एक सामान्य प्रवृत्ती आहे. लोक एकमेकांना खूश ठेवण्यासाठी गोड बोलतात, स्तुती करतात आणि वास्तव लपवतात. स्वार्थ, भीती, सामाजिक दबाव किंवा स्वीकार मिळवण्याची इच्छा वगैरे अनेक कारणे यामागे असतात. परिणामी, व्यक्तीभोवती एक भ्रमाचे आवरण तयार होते, ज्यामध्ये त्याला स्वतःचे दोष दिसत नाहीत. हीच स्थिती दीर्घकाळ राहिली, तर व्यक्ती वास्तवापासून दूर जाते आणि चुकीचे निर्णय घेते. इतिहासात आणि वर्तमानातही अनेक उदाहरणे आहेत. नेत्यांनी किंवा प्रभावशाली व्यक्तींनी फक्त स्तुती करणाऱ्यांवर विश्वास ठेवला आणि परिणामी त्यांचा पतन झाले. यावरून स्पष्ट होते की सत्य टाळणे हे केवळ वैयक्तिक नव्हे, तर सामाजिक आणि व्यवस्थात्मक पातळीवरही घातक ठरू शकते. मानसिक दृष्टिकोनातून पाहिले तर प्रतिकात्मक विसंगती ही संकल्पना येथे लागू होते. जेव्हा स्वतःवरील विश्वास आणि वास्तव यांच्यात विसंगती निर्माण होते, तेव्हा मन अस्वस्थ होते. या अस्वस्थतेपासून बचाव करण्यासाठी माणूस सत्य नाकारतो किंवा त्याचे विकृतीकरण करतो. मी चांगला माणूस व मीच खरा ही धारणा असल्यास, त्यास कोणी त्याची चूक दाखवली, तर ती स्वीकारणे त्यास कठीण जाते. कारण ते आपल्या आत्मप्रतिमेला आघात समजतात. त्यामुळे आपण त्या व्यक्तीवर दोष टाकतो किंवा तिचे म्हणणे दुर्लक्षित करतो. हा एक प्रकारचा मानसिक बचाव असला, तरी दीर्घकाळात तो आत्मविकासात अडथळा ठरतो.

तात्त्विक दृष्टीने हितकारक सत्य याच्याकडे नैतिक मूल्य म्हणून पाहिले जाते. सत्य सांगणे आणि स्वीकारणे हे दोन्ही सद्गुण मानले जातात. परंतु येथे एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की सत्य सांगताना संवेदनशीलता आवश्यक आहे. जरी ते योग्य असले तरी, कठोर आणि अपमानास्पद भाषेत सांगितलेले सत्य अनेकदा नाकारले जाते. त्यामुळे 'सत्य' आणि 'हित' यामध्ये संतुलन साधणे आवश्यक आहे. सत्य सांगण्यामागील उद्देश जर खरोखरच समोरच्या व्यक्तीचे कल्याण असेल, तर ते योग्य पद्धतीने मांडले गेले पाहिजे. आनंदाच्या संदर्भात पाहिले, तर अज्ञानातून मिळालेला आनंद आणि सत्यातून मिळालेला आनंद यामध्ये स्पष्ट फरक आहे. अज्ञानातील आनंद तात्पुरता असतो, कारण तो वास्तवावर आधारित नसतो. जसे एखाद्या व्यक्तीला आपली समस्या माहिती नसल्यामुळे तो निर्धास्त असतो, पण जेव्हा वास्तव समोर येते, तेव्हा त्याला धक्का बसतो. याउलट, सत्यावर आधारित आनंद सुरुवातीला कठीण वाटतो, कारण त्यात वास्तवाचा स्वीकार करावा लागतो. पण एकदा हा स्वीकार झाला, की त्यातून स्थिरता आणि आंतःरिक शांती निर्माण होते. जरी त्या मार्गावर सुरुवातीला कष्ट असले तरी त्यामुळे खरा आनंद हा सत्याशी जोडलेला आहे.

आनंद हा प्रत्येक जीवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आनंद हेच आहे.

भारतीय दर्शनानुसार, आनंदो ब्रह्मेति व्यजानात अर्थात आनंद हेच ब्रह्म आहे. प्रत्येक जीवाचा हा जन्मसिद्ध हक्क आहे की त्याने सुखी राहावे. परंतु, आजच्या आधुनिक काळात मानवाची अवस्था अशी झाली आहे की, तो आनंदाच्या महासागरात असूनही सुखाच्या थेंबासाठी तहानलेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मानवी मन भौतिक गोष्टींमध्ये, म्हणजेच दृश्य जगात पूर्णपणे अडकले आहे. जेव्हा मन बाह्य जगात गुंतते, तेव्हा त्याची विवेकबुद्धी क्षीण होते. अशा स्थितीत इतरांनी सांगितलेले हितकारक शब्द त्याला कळत नाहीत आणि जर कोणी आरसा दाखवण्याचा प्रयत्न केला, तर ते सत्य त्याला कडू वाटू लागते. नेमक्या याच मानवी प्रवृत्तीवर वाल्मीकि रामायणात महर्षी वाल्मीकींनी अतिशय मार्मिक भाष्य केले आहे.

**सुलभाः पुरुषाः राजन् सततं प्रियवादिनः।**

**अप्रियस्य तु पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः।।**

अर्थ- हे राजा, गोड बोलणारे लोक पावलोपावली सहज मिळतात. जे तुमच्या चुकांवर पांघरूण घालतात आणि तुमच्या अहंकाराला खतपाणी घालतात, अशा लोकांची जगात कमतरता नाही. परंतु, जे बोलणे ऐकायला अप्रिय आहे पण परिणामात अत्यंत हितकारक (पथ्यकारक) आहे, असे सत्य सांगणारा माणूस आणि ते शांतपणे ऐकून घेणारा माणूस, हे दोन्हीही जगात अत्यंत दुर्मिळ आहेत.

व्यवहारात पाहिले, तर हितकारक सत्य हे शिक्षण, आरोग्य, नातेसंबंध, नेतृत्व, आत्मविकास अशा अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे ठरते. तात्पुरत्या अस्वस्थतेद्वारे दीर्घकालीन कल्याण साधण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांच्या चुका दाखवतो, डॉक्टर कडू औषध देतो, मित्र स्पष्ट सल्ला देतो, या सर्व उदाहरणांमध्ये कल्याण हे एकच तत्त्व कार्यरत असते. परंतु या सर्व गोष्टींचा लाभ घेण्यासाठी व्यक्तीमध्ये स्वीकारण्याची तयारी असणे आवश्यक आहे. ही तयारी विकसित करणे हेच खरे साधन आहे. त्यासाठी आत्मपरीक्षण, नम्रता आणि सतत शिकण्याची वृत्ती आवश्यक आहे. हितकारक सत्य आणि  आनंद यांचा संबंध हा अत्यंत गूढ पण स्पष्ट आहे. जोपर्यंत माणूस फक्त प्रेयस गोष्टींमध्ये अडकून राहतो, तोपर्यंत तो बाह्य जगातच भटकत राहतो. पण ज्या क्षणी तो सत्यात्मक पथ्य म्हणजेच सत्य, टीका, आत्मपरीक्षण आणि सुधारणा स्वीकारतो, त्या क्षणी त्याच्या जीवनात खऱ्या आनंदाची सुरुवात होते. हा आनंद बाह्य परिस्थितींवर अवलंबून नसतो, तर तो अंतर्गत स्थिरतेतून निर्माण होतो. म्हणूनच, हितकारक सत्याचा स्वीकार ही केवळ नैतिक जबाबदारी नसून, ती आत्मोन्नतीची आणि चिरंतन आनंदाची किल्ली आहे.

**आत्मा मालिक। कृष्णार्पणमस्तु।**

**- बंडोपंत दि. कुलकर्णी,**

सोलापूर

(जिल्हा न्यायाधीश, पुणे)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## हरि दिसे जनीं वनी आत्मतत्त्वीं (भाग ४)

**ऐसी कर्मगती ऐसा 'ध्यानी ज्ञानिया':**

हरीनामाची व्याप्ती आणि लौकिक-अलौकीक मोल हे असे आहे! हरिभजनासी कधीही पारखे नसावे. दूर नसावे. योग, यज्ञयाग, व्यर्थ क्रियाविधी ही काही सिद्धीची शाश्वती नव्हेच. व्यर्थ उपाध्या, साधने, दंभाचार, सायास यामुळे काही साध्य होणार नाही. खऱ्या भावनेशिवाय देव नाही आणि गुरुलाभाशिवाय अनुभूती नाही, ही माउलींची दृष्टी. भाव भक्तीचे तपाचरण मोलाचे. गुरुकृपेचे गुज हिताचे. साधूसंत-सज्जनांच्या सहवासाशिवाय तरणोपाय मुळी नाही, असा दृष्टांत माउली देतात.

-डॉ. सुनील शिंदे

**मा**उलींनी भावाशिवाय भक्ती नसल्याचे आणि भक्तीशिवाय मुक्ती नसल्याचे हरीपाठात स्पष्ट केले आहे. बळाशिवाय शक्तीच्या वल्गनाही नसाव्यात असे संत ज्ञानदेवांनी पुढे बजावले! हरिनामावीण व्यर्थ शीण नसावा ही लाख मोलाची भावना ते व्यक्त करतात. संसार प्रपंचासाठी तर जीवाचा केवढा सायास, प्रचंड परिश्रम.. केवढा तरी आटापिटा! मग तेवढी तगमग, तळमळ हरिनामासाठी का नसावी? हरिभजनासी का पारखे असावे? हरिनाम जप तर किती अनमोल. हरीजपाने, हरीभजनाने खऱ्या अर्थाने प्रापंचिक आपदा दूर होतील. प्रपंचाचे धरणे तुटेल ही माउलींची स्पष्टोक्ती! हरीध्यानाचे मोल ते परोपरीने समजावून देतात. ध्यानी ज्ञानियाचे हे हितकारी बोल जीवासी तारणारे नक्कीच.

**भाववीण भक्ति भक्तिवीण मुक्ति।**
**बळवीण शक्ति बोलूं नये॥१॥**
**कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित।**
**उगा राहे निवांत शिणसी वायां॥२॥**
**सायास करिसी प्रपंच दिननिशीं।**
**हरिसी न भजसी कवण्या गुणे॥३॥**
**ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे।**
**तुटेल धरणे प्रपंचाचे॥४॥**

आशय : बळाविण शक्तीची बात करू नये, तसेच भावाविण भक्ती नाही आणि भक्तिवीण मुक्ती नाही. हरिनाम भक्ती केली नाही तर भगवंत कसा बरे प्रसन्न होईल? म्हणूनच जीवा, नामपाठ करत निवांत राहा. रोज करत असलेला प्रपंच प्रचंड सायास करून करीत असतोस, पण हरिभजनाला का विन्मुख होतोस? ह्या प्रपंचाचे धरणे उठवायचे असेल, तर फक्त हरिनामपाठ कर, असे माऊली सांगतात.)

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

हरीनामाची व्याप्ती आणि लौकिक-अलौकीक मोल हे असे आहे! हरिभजनासी कधीही पारखे नसावे. दूर नसावे. योग, यज्ञयाग, व्यर्थ क्रियाविधी ही काही सिद्धीची शाश्वती नव्हेच. व्यर्थ उपाध्या, साधने, दंभाचार, सायास यामुळे काही साध्य होणार नाही. खऱ्या भावनेशिवाय देव नाही आणि गुरुलाभाशिवाय अनुभूती नाही, ही माउलींची दृष्टी. भाव भक्तीचे तपाचरण मोलाचे. गुरुकृपेचे गुज हिताचे. साधूसंत-सज्जनांच्या सहवासाशिवाय तरणोपाय मुळी नाही, असा दृष्टांत माउली देतात.

**योग याग विधी येणे नोहे सिद्धि।**

**वायांचि उपाधि दंभधर्म।।१।।**

**भाववीण देव न कळे निःसंदेह।**

**गुरुवीण अनुभव कैसा कळे ।।२।।**

**तपेवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त।**

**गुजवीण हित कोण सांगे।।३।।**

**ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात।**

**साधूचे संगती तरणोपाय।।४।।**

आशय : योग, यज्ञ, विधीविधान ह्या मार्गाने त्याची प्राप्ती होणार नाही. ह्या उपाध्या उगाच लावून घेऊन दंभ का मिरवतोस? भावाविणे देव दुर्लभ आहे आणि अनुभव समजण्यास गुरुकृपा हवी. गतकाळातील आयुष्यातील पुण्यामुळे भक्तीची संधी मिळाली आहे, तेव्हा त्याचे तप केले नाहीस तर भगवंत कसा प्राप्त होईल? तसेच गुरुकृपेचे गुज गुरुंनी सांगितल्याशिवाय हित कसे तेही कोण सांगणार? साधुसंगतीने हित होते त्यामुळे साधुसंगतीशिवाय तरणोपाय नाही, असे दृष्टांत आहेत, असे माऊली सांगतात.

'गुजेवीण हित कोण सांगे' या चरणातील सद्‌गुरुंकडून होणारे गुज ही भावनाच मुळी अत्यंत उत्कट आहे. गुज असते भावनिक. गुज असते हितावह. गुज असते ते सावरणारे. मनाला दिलासा देणारे. कमालीचे आश्वासक अन् 'मी आहे ना पाठीशी..' असे भावनिक सौहार्द जपणारे अनमोल शाश्वत शब्द! ही शाब्दिक ऐश्वर्याची किमया माउलीच करू जाणे!

साधुसंतांचा, सज्जनांचा बोध हा तर न संपणारा ठेवा, न संपणारा ऐवज. आणि हाच ठेवा हरिनामाचा होय. तो तर मुरवून ठेवला जाणारा ठेवा हो. कापुराच्या प्रज्वलित ज्योतीची समाप्ती ही जशी त्या ज्योतीच्या विझण्यासह होते अगदी तशीच हरीनामाची समाप्ती शारीर अखेरीस होते. हाच तो मोक्ष आणि हीच ती भाग्यशाली अनुभूती! संत सज्जन-साधूसंगतीची गोडी भाग्यकारक. जनीवनी असल्याचाच हा आत्मबोध अन् तेच ते आत्मतत्त्व, असे सुरेख दाखले माउली ज्ञानोबाराय देतात.

**साधुबोध झाला नुरोनियां ठेला।**

**ठायींच मुराला अनुभव।।१।।**

**कापुराची वाती उजळली ज्योती।**

**ठायींच समाप्ती झाली जैसी।।२।।**

**मोक्षरेखे आला भाग्य विनटला।**

**साधूचा अंकिला हरिभक्त।।३।।**

**ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं।**

**हरि दिसे जनीं वनी आत्मतत्त्वीं।।४।।**

आशय : साधुचा बोध झाल्यावर न संपणारा ठेवा मिळतो. मात्र तो ठेवा म्हणजे हरिनामच आहे. तो अंगोपांगी मुरवुन ठेवावा लागतो आणि तो अनुभव मोठा असतो. कापुराची वात पेटवली की तिची समाप्ती त्या ज्योतीत होते तसेच त्या हरिनामाची समाप्ती शरिराबरोबर व्हायला हवी. अशा साधुबोधाने नटलेला भक्त मोक्षाला पोहोचतो व भाग्याचा ठरतो. साधुसंगतीची गोडी घेतली की तो जनात वनात हरिरुपाने आहे हा बोध होतो, असे माऊली सांगतात.

ही कर्मगती आणि ज्ञानी ध्यानियाची अनुभूती केवढी प्रगल्भ तसेच सद्‌बुद्धी देणारी. हरीपाठातील समग्र वैचारिक व्याप्ती थक्क करणारी. हरिभक्ती श्रेष्ठ, हरिभक्त भाग्यवान. हरीनाम तर तितकेच अवीट गोडीचे. तारणारे आणि निभावणारे, सांभाळून घेणारेही.

**- डॉ. सुनील शिंदे**

'दत्त सुकृत', 'व्हेलेन्सिया रेसिडेन्सी', ए-१ इमारत,
बी-विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती सहकारी साखर कारखाना रोड,
अकोले, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२/९०७५९९४३३२)

***



## अध्यात्म ज्ञानाचे महत्त्व

श्री गुरूभक्तीने आपली ही जीवननौका संसार भवसागरातून तरूण जाईल. कठीण प्रारब्ध भोग जरी वाट्यास आले तरी श्री गुरूकृपेने ते सुसह्य होऊन पेलले जातील व अंती निघून जातील. निष्ठेने केलेल्या गुरूसेवा व साधनेतून भक्ताचा आत्मोद्धार होतो. श्रीगुरू हे ईश्वर स्वरूप आहेत. गुरूभक्ती हीच ईश्वरभक्ती, श्रीगुरूंची भक्तिभावाने नित्य मानसपूजा करावी. श्री सद्‌गुरूंकडून मिळालेले नाम (नाममंत्र) सातत्याने घेतले की नामाचे प्रभावाने या जीवाची अनेक दुरिते निघून जातात. -बी.के. गायकवाड

**सृ**ष्टीत असंख्य जीवांमधील मानवी जन्म हा परमभाग्याने प्राप्त होतो व तो दुर्लभ आहे असे संत सांगतात. मानवाने प्राप्त सद्सद्विवेकबुद्धी व ज्ञानाने स्वस्वरूपास म्हणजेच आत्म्यास जाणून घ्यावे. आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे व तो सर्वांठायी हृदयमंदिरी निरंतर वास करतो.

जगद्‌नियंता परमात्म्याने निर्मिलेली संपूर्ण पंचमहाभूतात्मक सृष्टी सत्व, रज, तम या त्रिगुणांनी युक्त आहे. ती प्रकृती मायेच्या अधीन आहे. मूलतः हे तिन्ही गुण सर्वांठायी कमी-अधिक प्रमाणात असतात. मनुष्य जीवनात जे जे कर्म आचरतो ते या तीन गुणांनी युक्त असते. ते सात्विक, राजस, तामस या भावाने जाणले जाते. संत जगद्‌गुरू तुकाराम महाराज सांगतात, 'सत्वगुणी मानव हा सात्विक असतो. त्याची वृत्ती सेवाभावी व परोपकारी असते. सत्त्वाच्या सामर्थ्याने त्याच्याकडून परमार्थ घडतो.

मनुष्याचे बालपणीचे संस्कार गुरूजनांकडून मिळालेली शिकवण आणि जीवनात लाभलेली संगत या सर्वांचा स्वभाव गुणांवर प्रभाव राहतो. आहार, विहार आणि आचरण गुण प्रवृत्ती दृढ करतात. सात्विक आहार व सत्कर्माचे आचरण याने मनाची सात्विकता येते. पंचमहाभूतात्मक देह, मन, बुद्धी, अहंकार या अष्टदा प्रकृतीच्या देहाकडून कारणपरत्वे होणारी विविध विहित, नैमित्तिक आणि विशेष कर्मे मानवाचे जीवन घडवतात. अनेक जन्माच्या संस्काराने जीवात्मा शरीर म्हणजेच 'मी' असे समजतो व स्वस्वरूपाचा त्यास विसर होतो. देहबुद्धीमुळे सर्व कर्मांचा कर्ता आपण आहोत, हा मनीचा अहंकार घट्ट करतो व कर्मापासून उत्पन्न सुख-दुःख याचा अनुभव करतो. यालाच ईश्वर प्रकृती मायेचे बंधन म्हणतात.

संसार माया प्रकृतीच्या बंधनात गुंतलेला जीव प्रपंचात माया-ममता, देहसुख व त्यासाठी लागणाऱ्या वस्तूची जमवाजमव करतो. मी, माझे याची प्रपंचात आसक्ती निर्माण होते. देहबुद्धीमुळे मन इंद्रियाच्या इच्छा, वासनापूर्तीत जीवनकाळ व्यतीत होताना जीव कष्टी होतो. आत्मा शाश्वत सुखापासून वंचित राहतो. वस्तूपरत्वे मिळणारा आनंद तात्पुरता असतो.

संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात मुनष्याच्या जीवाला गर्भावस्थेपासून जीवनाच्या अखेरपर्यंत जीवन म्हणजे एक आवाहन असते. संघर्षमय जीवनात आपण सर्वभावे संतचरणी शरण जावे. संत

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

सहवास व संत संगतीत जीवाचे अज्ञान हळुवारपणे कमी होऊन देहबुद्धी कमी होते. मनात ईश्वरभक्तीची आवड येते. जीवाच्या पूर्वपुण्याईने अशातच श्री गुरूंची भेट होते. श्री गुरूभेट परमभाग्याची असते. आपण अनन्यभावे श्री सद्‌गुरू चरणी शरण जावे. गुरूंनी दिलेल्या साधनेतून, अनुष्टानातून आहार-विहार बंधने सांभाळून मन-चित्ताची शुध्दी होते. जीवाची आत्मउन्नती होते. जीवाला आपले सत्य स्वरूप जाणण्याची जिज्ञासा उत्पन्न होते व सद्‌गुरू अशा मुमुक्षु भक्ताला मार्गदर्शन करतात. श्रध्दा व भक्तीने गुरूसेवेतून भक्ताला अध्यात्मीक ज्ञान प्राप्त होवू लागते. 'श्रध्दावान लभयते ज्ञानम्.'

श्री गुरूभक्तीने आपली ही जीवननौका संसार भवसागरातून तरूण जाईल. कठीण प्रारब्ध भोग जरी वाट्यास आले तरी श्री गुरूकृपेने ते सुसह्य होऊन पेलले जातील व अंती निघून जातील. निष्ठेने केलेल्या गुरूसेवा व साधनेतून भक्ताचा आत्मोद्धार होतो. श्रीगुरू हे ईश्वर स्वरूप आहेत. गुरूभक्ती हीच ईश्वरभक्ती, श्रीगुरूंची भक्तिभावाने नित्य मानसपूजा करावी. श्री सद्‌गुरूंकडून मिळालेले नाम (नाममंत्र) सातत्याने घेतले की नामाचे प्रभावाने या जीवाची अनेक दुरिते निघून जातात. नाम महात्म्य महान असून सर्व संत महात्मे एकमुखाने नामाची महती सांगतात. नामाने जन्माजन्मांतरीची पापे नाहिशी होतात. श्री नारदमुनीने सांगितलेल्या रामनामाचे जपाने वाल्याचे वाल्मीकी ऋषी झाले. संत ज्ञानेश्वरांनी विचारल्यानंतर संत निवृत्तीनाथ म्हणतात 'नाम गगनाहून वाड आहे. अंतःकरणापासून घेतलेल्या नामाने भगवंताशी एकरूपता येते. यालाच सायुज्य मुक्ती म्हणतात.

आत्मा मालिक ध्यानयोग मिशन कोकमठाण येथून प.पू. सद्‌गुरूंनी भक्तासाठी स्वानुभवातील योग विद्येतील आठ अनुष्ठान सांगितले आहेत. लघु, नाम, जप, रूप, चिंतन, ज्ञान, स्वरूप आणि समाधी अनुष्ठान ही अनुष्ठाने आश्रमातील संत व प्रशिक्षित योगशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पात्र भक्ताकडून क्रमाक्रमाने नियमित करून घेण्यात येतात. अनेक आत्मप्रेमी भक्त ध्यान साधनेसोबत या अनुष्ठानांचा अभ्यास करून ती करीत आहेत. ही अनुष्ठाने भक्ताच्या आध्यात्मिक उन्नतीस सहाय्यभूत होतात.

श्री गुरूंची भेट घडेपर्यंत अध्यात्मिक ग्रंथ हेच गुरू होत. भगवंतांनी परमभक्त अर्जुनास सांगितलेल्या श्रीमद्‌भगवद्‌गीतेत ज्ञान, कर्म, आणि भक्ती या संदर्भात सखोल आणि परिपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले आहे. ज्ञान (आत्मज्ञान), विज्ञान (सृष्टी विज्ञान) यासाठी गीता समस्त मानवासाठी जीवनदायिनी आहे.

सर्व संत महात्म्यांनी त्यांच्या अध्यात्मिक कार्यातून सामान्य जीवास ईश्वरभक्तीचे वेड लावले. या संतांनी लिहिलेल्या अध्यात्मिक, कीर्तन, भजने यामधून सामान्य मानवास आध्यात्मिक ज्ञान सोपे करून समजावून दिले. सर्वांभूती एकच परमात्मा आत्मस्वरूपात आहे. यासाठी जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत ही शिकवण संतांनी दिली. अनेक जीवांचा आत्मउद्धार केला. संतांचे अनंत उपकार आहेत.

मनुष्याने जीवनात सात्त्विक वृत्तीने राहून विहित सत्कर्माचे आचरण करावे. केलेली कर्मे ईश्वरास समर्पित करून त्याच्या कर्तेपणाचा अहंकार ठेवू नये व फलाशा त्यागावी अशा निष्काम कर्माची सुख-दुःखाची बंधने जीवास होत नाहीत व जीवन्मुक्त अवस्था मोक्षास सहाय्य होते. यास्तव कर्मकौशल्य हा

एक योग आहे. कर्म करताना सावधानता असावी. जीव हाच एक आत्मा आहे व तो मूळचा सत्‌चित्‌आनंद स्वरूप आहे. जीवनमुक्तीसाठी व आनंदप्राप्तीसाठी जीवाचा सतत प्रयत्न चालू असतो. जीवनात आध्यात्मिक दृष्टिकोन असला तर जीवाला उन्नत होण्यासाठी सहाय्य होते. 'अध्यात्म' ज्ञान हे आत्म्यासंबंधी सद्‌गुरूचरणी शरण गेल्याने ते जाणले जाते. आपला देह हा जीवाचे आत्म्याचा निवास आहे. देह हा देवतामय असून, चैतन्यमय देहातील षड्‌चक्रे व त्यांचे कार्य, मन आणि इंद्रिये यांचे कार्य जीवाच्या साक्षीने चालते. ॐकार अक्षरब्रह्म आहे.

ऋषींनी आणि संतांनी लिहिलेल्या रचना श्री गणेश अथर्वशीर्ष, महिमन स्तोत्र, श्री विष्णुसहस्त्रनाम, श्री रामरक्षा, मनाचे श्लोक, हरिपाठ त्यातील अर्थासह पठण करताना आपली आध्यात्मिक उन्नती होते व पारमार्थिक जीवन अधिक चांगले बनविते. संत ज्ञानेश्वरांचा हरिपाठ असंख्य वारकरी म्हणतात त्यावेळी अंतःकरणी पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन होऊन जातात. हेच ईश्वरप्रेम होय. देव-देवतांचे शक्तीस्वरूप बीजमंत्र, गायत्री मंत्र यामधून उत्पन्न होणारी ऊर्जा, सूक्ष्मशक्ती स्वरूपात असते. त्यातून मानवाला आध्यात्मिक संपदा मिळते. ग्रंथ पारायण, या सर्वांपासून देवतांकडून, श्रीगुरूंकडून आशीर्वाद लाभतात. यासाठी श्रीगुरूंचे मार्गदर्शन असणे गरजेचे आहे. श्री सद्‌गुरूचरणी शरण जावे. आत्मज्ञानाची प्राप्ती केवळ श्रीगुरूकृपेने भक्ताला होते.

प. पू. सद्‌गुरू आत्मा मालिक सांगतात ईश्वर आत्मस्वरूपात सर्वांच्या हृदयी आहे. सर्व आत्म्यावर प्रेम करा. ध्यानाद्वारे आत्मचिंतन करून स्वस्वरूप आत्म्याची ओळख करून घ्या. आत्मज्ञान होईल. जीवनांत आत्मानंद होऊन शाश्वत सुख समाधान मिळेल.

**ध्यान करा, ध्यानी बना.**

**- बी. के. गायकवाड**

प्लॉट क्र. ५, नव महाराष्ट्र को. ऑप. हौ. सोसायटी
सातारा रोड, अरण्येश्वर कॉर्नर,
पुणे - ४११००९.
मो. नं. - ९४०३०२६१६४

***



## आत्मविश्वास

**आत्मविश्वास अस्तित्व का आधार है, यदि जीवन को एक रथ माना जाए, तो आत्मविश्वास उसका सारथी है। बिना आत्मविश्वास के व्यक्ति दिशाहीन हो जाता है। ज्ञान, कौशल, साधन-सब होने के बावजूद यदि आत्मविश्वास नहीं है, तो व्यक्ति अपने सामर्थ्य का उपयोग नहीं कर पाता। आत्मविश्वास वह शक्ति है जो कहती है-मैं कर सकता हूँ, क्योंकि मेरे भीतर परमात्मा का अंश है। - नरेश यादव**

**जी**वन की दिशा और वास्तविक लक्ष्य को पहचानकर और उसको सही तरीक़े से निभाने या हासिल करने के लिये एक बेहतर सेतु की आवश्यकता होती हैं और जब इस सेतु के दोनों किनारे सध जाते हैं तब एक भरोसे की ज़रूरत होती है कि हम सही आधारों पर हैं, फिर हमारा नि:संकोच आगे चल देना आत्मविश्वास कह लाता है।

आत्मा की जागृति से जीवन के उत्कर्ष तक, मनुष्य का जीवन केवल सांसों का प्रवाह नहीं, बल्कि चेतना का एक दिव्य अभियान है। इस अभियान में अनेक बाधाएँ, संशय, भय और संघर्ष आते हैं। इन सबके बीच जो शक्ति मनुष्य को गिरकर भी उठने, अंधकार में भी प्रकाश देखने और असंभव को संभव बनाने का साहस देती है, वही है-आत्मविश्वास। या यों कहें, आत्मविश्वास कोई बाहरी वस्तु नहीं है; यह आत्मा की आंतरिक अनुभूति है। यह वह स्थिति है जहाँ व्यक्ति अपने भीतर स्थित दिव्यता को पहचानता है और जीवन के हर क्षेत्र में उसी के अनुसार कार्य करता है।

आत्मविश्वास अस्तित्व का आधार है, यदि जीवन को एक रथ माना जाए, तो आत्मविश्वास उसका सारथी है। बिना आत्मविश्वास के व्यक्ति दिशाहीन हो जाता है। ज्ञान, कौशल, साधन-सब होने के बावजूद यदि आत्मविश्वास नहीं है, तो व्यक्ति अपने सामर्थ्य का उपयोग नहीं कर पाता। आत्मविश्वास वह शक्ति है जो कहती है-मैं कर सकता हूँ, क्योंकि मेरे भीतर परमात्मा का अंश है।

आत्मविश्वास भय से मुक्ति का माध्यम है भय मनुष्य का सबसे बड़ा शत्रु है। यह उसे उसकी क्षमता से दूर कर देता है। आत्मविश्वास भय का प्रतिकार है। जब आत्मविश्वास जागृत होता है, तब व्यक्ति समझता है, जो होना है, वह ईश्वर की इच्छा से ही होगा; मैं केवल कर्म करने वाला हूँ। यह दृष्टि भय को समाप्त कर देती है।

आत्मविश्वास सफलता का मूल मंत्र है, सफलता केवल बाहरी परिस्थितियों पर निर्भर नहीं करती; यह मन की स्थिति पर निर्भर करती है। आत्मविश्वासी व्यक्ति असफलताओं को भी सीढ़ी बना लेता है। मायथॉलॉजी से जोड़ें तो भारतीय संस्कृति में आत्मविश्वास के असंख्य उदाहरण हैं।

श्रीराम का आत्मविश्वास वनवास, सीता-हरण, रावण से युद्ध-इन सब परिस्थितियों में श्रीराम का आत्मविश्वास अडिग रहा। उन्होंने कभी यह नहीं सोचा कि वे अकेले हैं। उन्हें विश्वास था कि धर्म

उनके साथ है।

यह आत्मविश्वास ही था जिसने उन्हें मर्यादा पुरुषोत्तम बनाया।

श्रीकृष्ण और अर्जुन का संवाद (गीता) महाभारत का युद्ध केवल शस्त्रों का नहीं, बल्कि आत्मविश्वास का युद्ध था। अर्जुन जब मोह और भ्रम में डूब गया, तब श्रीकृष्ण ने उसे आत्मविश्वास का उपदेश दिया - **क्लैब्यं मा स्म गमः पार्थ** अर्थात-हे अर्जुन, दुर्बलता को मत अपनाओ। गीता का पूरा संदेश आत्मविश्वास की पुनर्स्थापना है।

**हनुमान जी का आत्मबोध**

हनुमान जी को अपनी शक्ति का ज्ञान नहीं था। जामवंत ने उन्हें उनकी शक्ति का स्मरण कराया। जैसे ही आत्मविश्वास जागा, हनुमान जी समुद्र लाँघ गए। यह प्रसंग सीखाता है, हमारी सबसे बड़ी सीमा हमारी विस्मृति है, और सबसे बड़ी शक्ति आत्मस्मरण।

स्वामी विवेकानंद, उनका प्रसिद्ध वाक्य-उठो, जागो और तब तक नहीं रुको जब तक लक्ष्य प्राप्त न हो जाए। यह आत्मविश्वास का घोष है। ध्यान और आत्मविश्वास- ध्यान के माध्यम से व्यक्ति अपने भीतर की शांति को अनुभव करता है। जब मन शांत होता है, तब आत्मविश्वास स्वतः प्रकट होता है। एक सूक्ष्म प्रसंग से समझें कि यह कहाँ से आता है और कहाँ आप इससे ऊपर भी निकल जाते हो तो सुने :

एक बार एक जिज्ञासु एक मौन ऋषि के पास पहुँचा।

उसने पूछा-गुरुदेव, मैं आत्मविश्वास कैसे प्राप्त करूँ?

ऋषि ने कुछ नहीं कहा।

उन्होंने केवल एक दर्पण उसके सामने रख दिया।

जिज्ञासु ने स्वयं को देखा।

कुछ समय बाद वह बोला-मैं तो वही हूँ जो मैं हमेशा से था।

ऋषि मुस्कुराए और इशारा किया-

यही तुम्हारी समस्या है।

तुम 'जो दिख रहे हो' उसे ही 'जो हो' मान बैठे हो।

फिर उन्होंने कहा-

जिस दिन तुम यह देख लोगे कि देखने वाला कौन है,

उस दिन आत्मविश्वास की आवश्यकता ही नहीं बचेगी-

क्योंकि तब तुम स्वयं 'आधार' बन जाओगे।

आत्मविश्वास का विकास कैसे करें

आत्मचिंतन : प्रतिदिन स्वयं से प्रश्न करें-मैं कौन हूँ? मेरा उद्देश्य क्या है?

सकारात्मक संगति : संतों और श्रेष्ठ विचारों का संग आत्मविश्वास को बढ़ाता है।

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

ध्यान और साधना : यह मन को स्थिर करता है और आत्मा से जोड़ता है।

कर्मयोग : फल की चिंता छोड़कर कर्म करना आत्मविश्वास को बढ़ाता है।

आत्मविश्वास केवल एक गुण नहीं, बल्कि जीवन की दिशा है। यह मनुष्य को साधारण से असाधारण बनाता है। जब मनुष्य अपने भीतर स्थित परमात्मा को पहचान लेता है, तब उसका आत्मविश्वास अडिग हो जाता है।

अंततः यही कहा जा सकता है, जिसने स्वयं पर विश्वास कर लिया, उसने ईश्वर को पा लिया। वह है आत्मविश्वास, जिसे एक वाक्य में कहूँ तो- आत्मा में स्थित होकर जीने की अवस्था। गुरु कृपा में अंतिम काव्य कुछ इस तरह उद्धृत है -

**न मैं कर्ता, न मैं भोक्ता,**
**न मैं बंधा, न मैं मुक्त,**
**मैं तो केवल साक्षी चेतन,**
**नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त।**
**यही विश्वास जब जागे भीतर,**
**तब जीवन हो जाता प्रकाश,**
**जिसने पाया यह आत्मबोध,**
**वही सच्चा आत्मविश्वास।**

**|| आत्मा मालिक ||**

**- नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

# आत्मा मालिक चैत्र महोत्सव २०२६

आत्मा मालिकध्यानयोग मिशन, कोकमठाण येथे दि. ३० मार्च ते १ एप्रिल २०२६ कालावधीत आत्मा मालिक चैत्र महोत्सव आयोजित करण्यात आला. दि. ३० मार्च रोजी पहाटे ब्रह्ममुहुर्तावर श्री पादुका अभिषेक, ध्यान, काकड आरतीने महोत्सवाची सुरुवात झाली.

चैत्र महोत्सवानिमित्त आश्रमातील सत्संग हॉल, आत्मस्वरुप मंदिर व प्रांगणात नेत्रदीपक विद्युत रोषणाई करण्यात आली हौी. उन्हापासून रक्षणासाठी मांडव व छत टाकण्यात आले होते.
चैत्र शुद्ध प्रतिपदेस नवचैतन्याचा गुढी पाडवा, शुद्ध नवमीला श्रीरामजन्म उत्सव झालेला, वसंताचे आगमन, वृक्ष-वनराई नव्या पालवीने पल्लवीत झालेल्या, मोहराने बहरलेले आम्रवृक्ष, रब्बी हंगामातील धान्याची सुगीची कामे नुकतीच उरकलेली. सर्वत्र आनंदी, उत्साही वातावरण. चैत्र महोत्सवासाठी बहुसंख्येने भाविकांचे आगमन झाले होते.

दि. ३० मार्च सकाळी ठिक ८.०० वाजता महादेवी हॉलमध्ये संतांसह आलेल्या भाविकांच्या उपस्थितीत सत्संग प्रारंभ झाला. आश्रमातील भजनी कलाकारवृंद व श्री. किशोर कटारे व कृष्णाजी यांनी आपल्या सुरेल वाणीतून संतांची भजने म्हटली. आत्मस्वरूप नमो नमः, गुरुदेव हमारा प्यारा, मेरे जीवन का उजाला, देव गुरुपाशी आहे, म्हणूनी गुरुशी भजावे, संतकृपा झाली, इमारत फळा आली आदी भजने म्हटली. यावेळी संतोष सुतार यांनी त्यांना तबल्याची सुरेल साथ केली.

संत परमानंद महाराज यांनी जीवनात भजनाचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे सांगितले. भजन करणारा व श्रवण करणारा दोघे भजनात अंतर्मुख झाल्याने स्वरूप चिंतन होते व जीवाचा उद्धार होतो. या भजनी कलाकारांचा आत्मस्वरुपाची प्रतिमा भेट देऊन ध्यानयोग मिशनद्वारे सत्कार करण्यात आला.

विश्वात्मक सद्‌गुरू जंगली महाराज यांच्या १३६ व्या पुण्यतिथीच्या पावन पर्वावर चैत्र महोत्सवासाठी आलेल्या सर्व भाविकांचे स्वागत करण्यात आले व आरतीने सत्संगाचे प्रथम पुष्प संपन्न झाले. तद्‌नंतर आलेल्या भाविकांनी दर्शन कुटीकडे जाऊन प. पू. सद्‌गुरूंचे रांगेतून दर्शन घेतले. सर्वांनी प्रसाद ग्रहण केला. संध्याकाळी पाच वाजात सौ. सविता नायगावकर व नायगाव सत्संग मंडळाचा हरिपाठ झत्तल. आरतीनंतर भाविकांनी प. पू. सद्‌गुरूंचे दर्शन घेतले.

सायंकाळी साडेसहा वाजता सागर म्हात्रे यांची सुश्राव्य भजनसेवा झाली. त्यांनी आपल्या भजनांत अबीर गुलाल, उधळीत रंग, नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग, माझे माहेर पंढरी, आहे भिवरेच्या तिरी, अवघे गर्जे पंढरपूर, चालला नामाचा गजर, कानडा राजा  पंढरीचा व अन्य भजने म्हटली. पांडुरंग पांडुरंग नामाने संपूर्ण सत्संग हॉल दुमदुमून गेला. टाळ्यांच्या गजरात भाविकांनी प्रतिसाद दिला.

संत निजानंद महाराज यांनी सद्‌गुरूंच्या वतीने धन्यवाद दिले व सत्कार केला. आरती होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

मंगळवारी ३१ मार्च रोजी पहाटे ब्रह्ममुहूर्तावर साडेतीन ते साडेसहादरम्यान ध्यानसत्र झाले व तद्‌नंतर नायगावकर व भजनीमंडळाची भजने व काकडआरती झाली.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

सकाळी दहा वाजता सत्संग हॉलमध्ये वर्षाताई रजनी पाटील (जाधव) यांनी दोन तासांची भजनसेवा श्रीगुरुचरणी सादर केली. संतांची भजने रुप पाहता लोचनी, सुख झाले हो साजनी, मन लागो रे श्री गुरु भजनी, गुरु माझे दिगंबर, ब्रह्मा विष्णू महेश्वर आदी भजने म्हटली. ज्ञानोबा माऊली तुकाराम या भजनांत व त्यांच्या जयघोषात सत्संगातील महिलावर्गाने नाचून आनंद व्यक्त केला. माध्यान्हवेळी सत्संगात प. पू. सद्गुरू माऊलींचे आगमन झाले. सर्वांनी आत्मा मालिक म्हणून प्रेमाने हात उंचावले. सत्संगातून सर्वांना श्रीगुरुदर्शन झाले. वर्षाताई यांचा सत्कार करण्यात आला. आरती झाली. सकाळच्या सत्संग सत्रानंतर भाविकांनी रांगेतून कुटीकडे जाऊन सद्गुरू माऊलींचे दर्शन घेतले. सायंकाळी पाच वाजता पुन्हा सविता नायगावकर व सत्संग मंडळाने हरिपाठ सादर केला. सायंकाळी साडेसहा वाजता संकेत दरकदार आणि जगदिश चव्हाण यांनी आपली भजनसेवा गुरुचरणी सादर केली. भजनातून संत तुकाराम महाराज, संत कबीर यांची भजने, दोहे म्हटले. स्वामी कृपा कधी करणार, तव चरणांचे दर्शन देणार, किती प्रेमळ सद्गुरू राया, पाय तुझे सद्गुरू राया, हृदयासी घ्यावे आदी भजने गायिली. संत परमानंद महाराज म्हणाले, हे दोन्ह भजन कलाकार पूर्वी आश्रमात श्रीगुरुसेवेत भजने म्हणत. आज या महोत्सवास साधक कलाकार आंतरिक गुरुदेवांच्या भेटीस आले. त्यानंतर शेजारती झाली. दोन्ही कलाकारांचा सत्कार करण्यात आला. भाविकांनी सद्गुरूंचे दर्शन घेतले.

बुधवारी १ एप्रिल रोजी चौदस आणि चैत्र पौर्णिमा एकत्र आली. पहाटे ब्रह्ममुहूर्तावर ध्यान, पादुका अभिषेक व काकडआरती झाली. सकाळी ७ ते ९ शांत होमहवन विधी संतांच्या उपस्थितीत व नवदाम्पत्याच्या हस्ते पार पडला. दरम्यान, मालेगाव येथील सत्संग मंडळ व भाविकांची पायी दिंडी तीन दिवस प्रवास करीत आश्रमात पोहचली. आत्मस्वरूप मंदिरात आरती झाली. चैत्र महोत्सवाच्या पावन मुहुर्तावर राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भाविक आलेले होते. आश्रमातर्फे सर्वांची निवास, प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यासाठी आश्रमातील प्रसादालयातील सेवक, कर्मचारी व विश्वस्त बाळासाहेब गोरडे व अन्य अधिकारी सेवेसाठी तत्पर होते. आत्मा मालिक चैत्र महोत्सवानिमित्त आत्मा मालिक हॉस्पिटलकडून महात्मा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेअंतर्गत गरजू भाविकांसाठी मोफत आरोग्य तपासणी, मार्गदर्शन व उपचार, शस्त्रक्रिया यांचे आयोजन करण्यात आले होते.

मागील अनेक वर्षांपासून प. पू. सद्गुरू माऊलींच्या मार्गदर्शनाखाली चैत्र महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. अष्टांगयोगी जंगली महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त हा महोत्सव करण्यात येतो. प. पू. सद्गुरूंचे ते श्रीगुरू. त्यांचे कृपाशिर्वाद घेऊन अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी जीवनात शाश्वत सुख, समाधान व शांतीसाठी प. पू. सद्गुरूंनी विश्वात्मक कार्य हाती घेतले. भाविकांच्या जीवनाचे सार्थक व्हावे यासाठी स्वस्वरूप आत्म्याची ओळख व्हावी, आत्मज्ञान व्हावे, ईश्वरस्वरूप निर्गुण निराकार आत्म्याला जाणण्यासाठी ध्यानाद्वारे आत्मचिंतन करून स्वस्वरूप आत्मा जाणावा. सर्वांभूती परमात्म्याचा अंश आहे. आत्म्यावर प्रेम करा हा विश्वात्मक संदेश सद्गुरूंनी जगाला दिला आहे.

१ एप्रिलला सकाळी ज्या भाविकांनी ४५ दिवस उपवासांचे अनुष्ठान, पाच दिवस पाण्याच्या

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

उपवासांसह केले होते, त्यांच्या अनुष्ठानाची सांगता शांतिमाई यांच्या हस्ते, सद्गुरूंच्या उपस्थितीत झाली. सात्विक आहार विहार, देह, मन चित्त शुद्धीसाठी असे अनुष्ठान उपयुक्त ठरते.

सकाळी दहा वाजता महादेवी सत्संग हॉलमध्ये सत्संगास प्रारंभ झाला. गुजरात, सौराष्ट्रातून आलेल्या कृष्णाबेन कातोंडिया व महेशभाई बरोलिया यांनी गुजरातीतून संतवाणी, गुरुभक्तीपर भजनगीते सादर केली. संत कबीरांची भजने गायिली. त्यांनी भजनाद्वारे श्रीगुरूंची भक्ती व गुरुध्यानाचे महत्त्व विशद केले. सर्व तीर्थे ज्याचे पायी एकवटतात, त्या श्रीगुरुंना शरण जावे व त्यांचे चरण सेवावे, असे भजनातून सांगितले.

संत परमानंद महाराज यांनी सर्व भाविकांचे स्वागत केले. ते पुढे म्हणाले, अजानुबाहु श्री जंगली महाराज यांच्या १३६ व्या पुण्यतिथीप्रसंगी या पावन दिनी सुरू असलेल्या चैत्र महोत्सव, त्यांच्या विश्वात्मक कार्यासाठी आहे व तो अजरामर राहील. तद्नंतर ध्यान सुरू झाले. दरम्यान, सकाळी ११ वाजता प. पू. सद्गुरूंचे सत्संग हॉलमध्ये आगमन झाले. सर्व भाविकांना आत्मस्वरूपाचे दर्शन, अंतरात्म्याची ध्यानाद्वारे पूजा तीच आत्मपूजा भाविकांकडून झाली. श्री गुरु महाराज गुरू, जयजय परब्रह्म सद्गुरू हा जयघोष झाला. आत्मदेवाची आरती झाली. तद्नंतर सर्व भाविकांनी कुटीकडे जाऊन रांगेतून दर्शन घेतले. सायंकाळी आलेल्या सर्व भाविक व संतांच्या समवेत चैतन्यपुरी नगर प्रदक्षिणा, पालखी सोहळा मोठ्या उत्साहात झाला. सायंकाळी कृष्णाबेन कांतोडिया व महेशभाई बरोलिया यांची उर्वरित गुजराती संतवाणी, भजने झाली. सविता नायगावकर व भजनी मंडळाचा हरिपाठ व गरबा झाला.

ज्या भाविकांनी गुरुमंत्र, नामदानासाठी नोंद केली होती, त्यांना संध्याकाळी सद्गुरूंकडून नाम देण्यात आले. या चैत्र महोत्सवासाठी आलेल्या सर्व भाविकांच्या उपस्थितीत मान्यवरांचे तसेच चैत्र महोत्सवानिमित्त अन्नदानासाठी सहकार्य केलेल्या, उत्सवासाठी परिश्रम घेतलेल्या सर्वांचे आत्मा मालिक ध्यानयोग मिशनद्वारे गुरुकृपाशिर्वादासह आभार व्यक्त करण्यात आले. यानंतर चैत्र महोत्सवाची सांगता झाली. आत्मा मालिक.

**- बी. के. गायकवाड**

प्लॉट क्र. ५, नव महाराष्ट्र को. ऑप. हौ. सोसायटी
सातारा रोड, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे - ४११००९.
मो. नं. - ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.




**✻ प्रेषक ✻**

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१